# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २९/१२/२०२३ चे ००.०१ ते १६.०० वा.

## खुण

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे सिटी कोतवाली अम शहर अप क्र ५९७/२०२३ कलम ३०२,३०७,५०७,१२०(ब), ३४ भा.द.वी, सहकलम १३५ म.पो.कॉ. | इर्विन चौक येथील रसुल यांचे चहा कॅन्टिंग दुकानासमोर अमरावती | घ ता वेळ- दि २९/१२/२०२३ चे ०१.३० वा<br><br>दरम्यान<br><br>दा ता वेळ - दि २९/१२/२०२३ चे ०७.३३ वा. | अरविंद आबारावजी इंगोले वय ४० वर्ष व्यवसाय - बिजनेस रा. केवल कॉलनी रेणुका दळन केंद्र जवळअमरावती | १) नवनित संतोष पवार रा. हमालपुरा अमरावती , २) उज्वल चव्हाण रा. हमालपुरा अमरावती ,३) आकाश सुरोसे रा. हमालपुरा अमरावती , ४) आकाश हरले रा. गाडगेनगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे दि. २८.१२.२०२३ रोजी अंदाजे रात्री ११.०० वा. चे सुमारास मी व माझा मित्र अजय विठ्ठलराव कंगाले रा. समाधान नगर , योगेश चोरे वय ४० वर्ष सचिन सदावर्ते दोघेही रा. आदीवासी कॉलनी अमरावती असे चौघे करणबार हमालपुरा येथे दारु पिण्याकरिता गेलो . करणबार येथील टेबलवर बसुन दारुची ऑर्डर दिली व गोष्टी करित बसलो तेवढ्यात तेथे नविन संतोष पवार उर्फ नवल पवार रा. हमालपुरा अमरावती हा तेथे आला व काहीही कारण नसतांना माझ्या सोबत वाद करु लागला त्यामुळे माझे मित्र अजय कंगाले, योगेश चोरे , सचिन सदावर्ते यांनी आमच्यातील वाद सोडवीला . त्यानंतर करणबारयेथील स्टाफने सुद्धा मध्यास्थी करुन आमच्यातील वाद सोडवुन आम्हाला तेथुन जाण्यास सांगीतले. त्यामुळे आम्ही चौघे दारु न पीता तेथुन निघुन गेलो व नंतर लॅन्ड मार्क बिअप शॉपी रुख्मीनी नगर येथे दारु पिलो दि. २९.१२.२०२३ चे १२.३० वा. सुमारास उज्वल चव्हाण रा. हमालपुरा अमरावती वय २६ वर्ष याला मी फोन केला व म्हटले कि तुझा मित्र नविन पवार हा कोणतेही कारण नसतांना माझ्या सोबत वाद करित आहे. तेव्हा उज्वल चव्हाण याने तो फोन नविन पवार याला दिला त्यावरुन नविन पवार याने मला फोनवर शिवीगाळ करुन धमकी दीली. त्यामुळे मी त्याचा फोन कट केला व मी हमालपुरा येथे राहणारा माझा मित्र नरेंद्र जाधव वय ४० वर्ष याला फोन करुन घडलेली हकीकत सांगीतली तेव्हा त्याने आपन उद्या आपसी करुन घेवु अले म्हटले त्यानंतर योगेश चोरे त्याच्या घरी निघुन गेला. रात्री अंदाजे ०१.३० वा. चे सुमारास सचिन सदावर्ते व अजय कंगाले हे एका टि व्हीलर व मी सुद्धा माझ्या कडील टु व्हीलर क्र. MH २७ BY १३२४ ने ईर्विन चौक येथिल रसुल यांचे चहा कॅन्टिंग दुकानासमोर आलो व आम्ही आपसात बोलत असतांना तेथे नविन पवार ,आकाश हरले, आकाश सुरोसे, उज्वल चव्हाण हे त्यांचे मोटर सायकल ने आले व आमच्या सोबत वाद करु लागले तेव्हा याने अजय कंगाले ला लोखंडी रॉड मारला त्यानंतर माझ्या पायाला तसेच हाताला लोखंडी रॉड मारला म्हणुन मी त्याचा रॉड हाताने पकडला तेव्हा उज्वल चव्हाण व आकाश सुरोसे रा. दोन्ही रा. हमालपुरा या दोघांनी अजय कंगाले याला पकडुन ठेवले व नविन संतोष पवार याने त्याच्याकडील चाकुने अजय कंगाले याच्या पोटात चाकु मारला त्यानंतर अजय रक्ताचे थारोड्याखाली पडला. म्हणुन आम्ही सर्वांनी आरडाओरड करणे सुरु केले. आम्हाला मारणारे नविन पवार उज्वल चव्हान , आकाश हरले , आकाश सुरोसे, हे त्यांचेकडील मोटर सायकल ने तेथुन पळुन गेले त्यानंतर मी व माझा मित्र सचिन जनार्धन सदावर्ते असे माझ्या मोटर सायकल वर अजय कंगाले ला बसवुन इलाजा करिता ईर्विन दवाखाना येथे नेले इलाजा सुरु असतांना डॉ. सा. यांनी अजय कंगाले याला मृत घोषीत केले. त्यानंतर मी अजय याचे नातेवाईकांना घटने बाबत माहीती दीली. माझा मित्र अजय कंगाले याला उज्वल चव्हान , आकाश सुरोसे यांनी पकडुन ठेवले व नविन पवार याने त्याचे जवळील चाकुने पोटात मारले त्यामुळे अजय कंगाले चा खुन केला. वरिल नमुद चारही आरोपीतांनी कट रचुन खुन केला आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व.पो.नि. सा. व डी.ओ. यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## पळवुण नेणे

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे बडनेरा अपक्र.९०७/ २३ कलम ३६३ भा.दं.वि. | रेल्वे स्टेशन बडनेरा वस्ती बडनेरा | घटना ता.वेळ - दि.२७.१२.२० २३ चे १७.०० वा. माहिती ता.वेळ - दि.२९.१२.२० २३ चे ११.०० वा. दाखल ता.वेळ - दि.२९.१२.२० २३ चे १२.०२ वा. | मोहम्मद अनीस अली मोहम्मद वय- ४५ वर्ष रा. ग्राम रन्डा लच्छीपुर बकाहुआ सितापुर महमुदाबाद उत्तरप्रदेश ह.मु.राजीक रहेमान अब्दुल रहेमान यांचे घरी भाड्याने अलमास नगर बैल बाजर चे मागे जुनी वसती बडनेरा | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की,यातील फि.हे साडी विक्री चा व्यवसाय करतात. फि.यांचा मुलगा अतेशाम अनिसखान वय- १६ वर्ष हा सुध्दा त्यांचे सोबत साडी विक्री करते. दि.२७.१२.२०२३चे ०७.३० वा. दरम्यान अतेशाम हा ३५-४० साडी विक्री करण्याकरिता घरुन निघाला व तो ०१.०० वा. पर्यंत घरी परत आला नाही. वरुन त्यास त्याचे मो.क्र. वर कॉल केला असता मोबाईल बंद दाखल आहे. वरुन आम्ही परिसरात व बडनेरा व नातेवाईकांत शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. त्यास कोणी अज्ञात इसमाने फुस लावुन पळुन नेले अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र.१०९८/२० २३ कलम ४५४,४५७, ३८० भादवि | गौरीशंकर ले आऊॅ महादेखोरी अमरावती | दि.२१.१२.२० २३ चे १९.०० ते दि. २९.१२.२०२३ चे ०७.०० वा दा.ता.वेळीदि. २९.१२.२०२३ चे १४.००वा | अनामत बळीराम बरडे रा. गौरीशंकर ले आउट महादेवखोरी अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी दहे त्याचे परिवारासह मुंबई येथे साक्षगंध असल्याने गेले होते व आज दि. २९/१२/२०२३ फिर्यादी व त्यांची पत्नि सकाळई ०७.०० वा साक्षगंध कार्यक्रम संपवुन घरी परत आले असता समोरील वालकंम्पाउंड चे गेट उघडुन आतमध्ये प्रवेश केला असतचा समोरिल दरवाज्याच्या कडीकोंडा तोडलेला दिसला व घरात पाहणी केली असता बेडरुमधील असलेले लोखंडी कपाट उघडे दिसले व कपाटामधील कपडे अस्थवस्थ बाहेर फेकलेले दिसले . कपाटातील लॉकर उघडे असुन त्यामधील ५००रुपयाचे नोटा अमदाजे ५००० रु. व सोन्याचे कानातले ३ग्रॅम कानातील रिंग २ग्रॅम कि.अं.२०,००० व कपाटात पिसवीत ठेवलेले पैसे कि.अं.१००० रु. असा एकुण २६,०००/-रु. चा माल अज्ञात चोराने घरात प्रवेश करुन चोरुन नेला अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|

## ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र.१०९८/२०२३ कलम २८३ | त्रिकोणी बगीच्या जवळ कॉम्प अमरावती | दि. २९.१२.२०२३ चे १०.० वा दा.ता.वेळ दि.२९/१२/२०२३ चे १५.११ वा | सरतर्फे ASI प्रविण इखार ब.नं. ८५९ पो.स्टे.फ्रेजरपुरा अम.शहर | अनिल रमेश कांबळे वय ४१ वर्ष, रा. देशमुख यांचे घरी भाड्याने वृंदावन कॉलनी अमरावती | हकीकत असा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो.स्टाफ सह पो.स्टे. सह पो.स्टे. हद्दीत पेट्रोलींग करित असतांना नमुद घ.ता.वेळी यातील आरोपी हा त्याच्या ताब्यातील भाजीपाल्याची चारचाकी लोडगाडी रस्त्यावर लावलेली आढळुन आली हे सार्वजनिक रोडवर धोकादायक स्थितीत उभे करुन वाहतुकीस अडथळा निर्माण करतांना मिळुन आला त्याचे विरुध्द कलम २८३ भादवि प्रमामए कायदेशी फिर्यादी वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे बडनेरा अप.क्र. ९०८/२३ कलम १४२ मपोका | राहते घरी माताफैल जुनी वस्ती बडनेरा | घटना ता.वेळ - दि२९.१२.२०२३ चे १२.००वा. . दाखल ता.वेळ - दि.२९.१२.२०२३ चे १३. २३वा. | सरतर्फे नापोका इरफान रायलीवाले ब.न. १८७१, पो.स्टे. बडनेरा | निरज हरिभाऊ टेंभुर्णे वय ३८ वर्ष रा. माताफैल जु.व. बडनेरा. | हकिकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हा मा.पो.उप.आ..सा.परि.१ अमरावती शहर यांचे आदेश क्र.पोउपआ/परि.-१/तडीपार/१९०६/२०२२/दि.०९.११.२०२२ नुसार दोन वर्षाकरिता अमरावती शहर व जिल्ह्यामधुन तडीपार असतांना नमुद तडीपार इसम याने अमरावती शहरात कोणताही परवानगी आदेश न घेता मा.पो.उपआयुक्त सा. यांचे आदेशाचे आदेशांचे उल्लंघन करुन घटनास्थळावर फिरतांना मिळुन आला. वरुन सदर आरोपीचे कृत्य कलम १४२, म.पो.का प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |

# प्रोव्हीशन रेड

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो.स्टे. खोलापुरी गेट | 279/2023 कलम ६५(इ)मदाका | महाजनपुरा शीला आठवलेच्या घराजवळ अमरावती | 28/12/2023 चे 21.35 वा | दाखल 29/12/2023 चे 06.56 वा | सर तर्फे पोहेकां राम लोखंडे ब.न 1114 पो स्टे खो गेट अम शहर | एक महीला | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी पो स्टे हद्दीत पेट्रोलीग करीता असतांना मिळालेल्या गुप्त माहीती वरुन नमुद आरोपीवर प्रो रेड केला असता नमुद महिलेल्या हातातील प्लास्टीक थैलीची पाहणी केली असता त्यामध्ये देशी दारु बाँबी संत्रा कंपनिच्या प्रत्येकी 180 मिलि च्या 7 नग पावट्या कि. अंदाजे 490 रुपये चा प्रो माल मिळुन आला नमुद महिलेचे कृत्य कलम 65(इ) मदाका प्रमाने होत असल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |